

देगलूर : प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांच्या हस्ते झाले.

# देगलूर महाविद्यालयात ग्रंथालय प्रदर्शन

देगलूर : येथील गटसाधन केंद्र पंचायत समितीच्या वतीने महावाचन उत्सव २०२४ उपक्रमांतर्गत ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. देगलूर महाविद्यालयात सोमवारी (ता.३०) झालेल्या तालुकास्तरीय ग्रंथालय प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी तोटरे, शिक्षण विस्तार अधिकारी शिवशंकर झंपलवाड, राजेश्वर किसवे, दशरथ पांचाळ, ग्रंथपाल साईनाथ शिंदे, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, पर्यवेक्षक पाटील, प्रा. महेश कुलकर्णी, प्रा. शिवचरण गुरूडे, प्रा. सीताराम हाके, वरिष्ठ लिपिक दत्तप्रसन्न साखरे उपस्थित होते. यावेळी तालुक्यातील तसेच शहरातील शाळांनी ग्रंथालयातील पुस्तके आणून येथे प्रदर्शनास ठेवली होती. विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी ग्रंथालय परिसर, वाचन कक्ष, ग्रंथदालन व ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली.

Scanned with OKEN Scanner